MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

कार्यालय:- कार्यकारी अभियंता, ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग वाळुज औरंगाबाद
पत्ता: प्लॉट नं. एल - २,एल - ३, सॅट कंपनी जवळ, एम.आय.डि.सी वाळुज ता. गंगापुर, जि.औरंगाबाद.

Phone No 8554995011, 8554995420
Email – ee2130@mahatransco.in    Web – www.mahatransco.in

काअ/४०० के.व्ही./ग्र.कें./वाळुज/मासं/ 0031    दिनांक- 18 JAN 2022

## जाहीर नोटीस

महापारेषण ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग वाळुज अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणुन सन २०२२-२३ करीता वीजतंत्री (ईलेक्ट्रिशियन) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग वाळुज च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन अर्ज व जाहिरातीत नमुद ईमेलवर जाहिराती सोबत दिलेला फॉर्म व त्याशी संबंधीत कागदपत्रे पाठवणे बंधनकारक आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि. ३१/०१/२०२२ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत राहिल, त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी. वीजतंत्री (ईलेक्ट्रिशियन) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल.

| आस्थापनेचा नाव व रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण | विहित फॉर्म ज्या ईमेल आयडीवर पाठवयाचा आहे तो ईमेल आयडी |
|---|---|---|---|
| ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग वाळुज E05202700377 | वीजतंत्री (Electrician) | एकुण जागा ०८ | ee2130waluj@gmail.com |

शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नौकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(बा.गो.पोटे)
कार्यकारी अभियंता
४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग वाळुज

सोबत:- शिकाऊ उमेदवार भरती करता अनुसरित येणारी पध्दत, अटी व फॉर्म

## शिकाऊ उमेदवार भरती करता अनुसरित येणारी पध्दत व अटी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव व पत्ता | :- | | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,<br>४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग वाळुज |
| २. | मागणी करणारे अधिकारी यांचे पदनाम | :- | | कार्यकारी अभियंता |
| ३. | निवड पध्दत | :- | | गुणवत्तेनुसार |
| ४. | क) भरावयाच्या पदाचे नाव व संख्या | :- | | वीजतंत्री (शिकाऊ प्रशिक्षणार्थी) पदसंख्या :-०८ |
| | ख) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी | :- | | वीजतंत्री १ वर्ष |
| | ग) विद्या वेतन | :- | | शासकिय धोरणानुसार |
| ५. | शैक्षणिक अर्हता | १. | | इ. १० वी उत्तीर्ण |
| | | २. | | राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद एन. सी. टी. व्ही. टी. नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन आय. टी. आय. दोन वर्ष वीजतंत्री (Electrician) परीक्षा उत्तार्ण असणे आवश्यक. |
| ६. | राखीव पदे | :- | | कंपनीच्या धोरणानुसार |
| ७. | भरती प्रक्रिया पुढील प्रमाणे राबविण्यात येईल | १. | | जे उमेदवार w::ww.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करतील व त्या अर्जाची Screen shot सहीत यासोबत जोडलेला फॉर्म भरुन नमूद ईमेल ee2130waluj@gmail.com वर आवश्यक दस्तऐवजसह पाठवावी. |
| | | २. | | **लगतवरच्या रकाना मध्ये नमुद असल्यानुसार दोन्ही स्वरूपात अर्ज करणा-यांचेच अर्ज विचारात घेतले जातील.** |
| | | ३. | | आय. टी. आय. उत्तीर्ण गुण व एस. एस. सी. उत्तीर्ण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. |
| | | ४. | | कंपनीच्या विहीत तरतुदीनुसार आरक्षणानुसार निवड यादी तयार केली जाईल. एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते गुणवत्तेनुसार प्रवर्गाचा विचार न करता भरले जाईल. |
| | | ५. | | निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडुन वैद्यकिय चाचणी करून घेणे बंधनकारक राहिल. |
| | | ६. | | कॉन्ट्रॅक्ट रजिस्ट्रेशन झाल्याशिवाय कोणताही उमेदवार शिकाऊ उमेदवारीस पात्र ठरणार नाही. |
| ८. | वयोमर्यादा | :- | | दि.३१.०१.२०२२ रोजी किमान १८ वर्ष पुर्ण /कमाल ३८ वर्ष (मागासवर्गीय /आर्थिक दुर्बलघटक यांना ५ वर्ष शिथीलक्षम) |
| ९. | शिकाऊ उमेदवार पदे भरावयाची अंतिम तारीख | :- | | दि. ३१/०१/२०२२ (२३.५९) पर्यंतचे अर्ज |
| १०. | उमेदवार यांनी घ्यावयाची काळजी बाबत | १. | | उमेदवाराने आपला प्रोफाईल तपासुन घेणेची जबाबदारी उमेदवारीची असेल. |
| | | २. | | ऑनलाईन अर्ज सादर करताना एस. एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी.आय विजतंत्री उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करुन माहिती भरावी. |
| | | ३. | | एस. एस. सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र, आय. टी. आय. उत्तीर्ण सर्व सत्रांचे गुणपत्रक / प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) स्वसांक्षाकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असेल तर मागासवर्ग जात प्रमाणपत्र तसेच आर्थिक दुर्बल घटक (EWS) मधुन अर्ज केला तर (EWS) प्रमाणपत्र www.apprenticeshipindia.gov.in वर अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच सोबत जोडलेला विहित फॉर्म screenshot आवश्यक दस्ताऐवज सोबत सादर करणे बंधनकारक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४. | शिकाऊ उमेदवारांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस. एस. सी मार्क, आय. टी. आय. मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. |
| | | ५. | शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-याकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी. |
| | | ६. | शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पश्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन अर्ज सादर करावा. व ईमेलवर पाठविण्यात येणारा फॉर्म दस्ताऐवज फोटो सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| | | ७. | प्रत्येक उमेदवाराची वर्तणुक चांगली व शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे. या बाबत कोणतीही गैरवर्तणुक केल्यास शिकाऊ कायदा १९६१ मधील १७ अन्वये शिक्षेस ते पात्र ठरतील. |
| | | ८. | प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ३०० मार्कची (६ तास अवधीची) परिक्षा उमेदवाराने देणे अनिवार्य राहील.<br>जो उमेदवार प्रशिक्षण कालावधी पुर्ण करेल तोच उमेदवार परीक्षेस बसण्यास पात्र असेल. |
| ११. | **एकाच उमेदवाराने खालील विभागीय कार्यालयास एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास.**<br>१. अउदा संवसु विभाग औ.बाद,<br>२. अउदा संवसु विभाग जालना,<br>३. अउदा संवसु विभाग परभणी,<br>४. ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज,<br>५. ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग थापटीतांडा<br>६. ७६५ केव्ही ग्रहण केंद्र विभाग एकतूनी | :- | एकाच उमेदवाराने अउदा संवसु मंडल कार्यालय औरंगाबाद या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या समोर नमुद विभागीय/आस्थापना कार्यालयात प्रत्येकी एक प्रमाणे असे एकुण ६ अर्ज केल्यास किंवा एका पेक्षा जास्त अर्ज केल्यास व त्या उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड एकापेक्षा जास्त कार्यालयात होत असल्यास अशा उमेदवाराची निवड त्यांने ईमेलवर पाठविलेल्या फॉर्म मध्ये नमुद पत्ता, ज्या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येतो किंवा नजीक आहे त्या एकाच ठिकाणी त्याची निवड करण्यात येईल आणि ते अंतिम असेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रत्येक फॉर्मवर वेगवेगळे पत्ते नमुद केल्यास फॉर्मवरील व आधारकार्ड वरील पत्ता एक असेल असाच पत्ता विचारात घेण्यात येईल. |
| १२. | अचुक माहिती भरणे | :- | उमेदवारांनी आपली प्रत्येक माहिती अचुकपणे विहित फॉर्म मध्ये भरावी कारण त्यात नमुद माहिती आधारे निवड यादी बनविण्यात येणार असुन त्यात पुन्हा बदल करता येणार नाही. निवड यादीत नमुद उमेदवारांचीच फक्त कागदपत्रे निवड झाल्यानंतर पडताळण्यात येतील. पडताळणी अंती अपात्र ठरल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा विचार केला जाईल. **फॉर्म मधील चुकीच्या भरलेल्या माहितीमुळे निवड झाली नाही तर त्यास संपुर्णपणे उमेदवार जबाबदार राहील.** |
| १३. | इतर संबंधित माहिती | :- | सदर शिकाऊ भरतीमध्ये अंशत: बदल किंवा संपुर्ण रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवत आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. तसेच सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| १४. | निवड यादी | | www.mahatransco.in या संकेतस्थळावर Carrier या सदराखाली प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५. | मदतीसाठी संपर्क | :- | udchr2130@mahatransco.in |

(बा.गो.पोटे)
**कार्यकारी अभियंता**
**४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग वाळुज**

## शिकाऊ उमेदवारीसाठीचा अर्ज
## (जो जाहिरातीत नमुद ई.मेलवर स्कॅन करून पाठवायचा आहे)

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव (आधार व शैक्षणीक कागदपत्राशी सुसंगत) :-

२. जन्मतारीख १०वी च्या सनद नुसार :-

३. जातीचा प्रवर्ग (महाराष्ट्र शासनानुसार वर्गीकृत प्रवर्ग) (अजा/अज/विजा.अ/भज.ब/ भज. क/भज.ड/विमाप्र/इमाव/ईडब्युएस/खुला) :-

४. आधार क्रमांक :-

५. दहावीचे गुण एकुण गुण :- प्राप्त गुण टक्केवारी

६. आय.टी.आय.चे गुण (चार सत्रे) :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टक्केवारी | |
| व्दितीय सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टक्केवारी | |
| तृतीय सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टक्केवारी | |
| चतुर्थ सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टक्केवारी | |

७. सध्याचा पत्ता :-

८. भ्रमणध्वनी क्रमांक :-

९. अचुक व कार्यान्वीत ई.मेल पत्ता :-

### प्रतिज्ञापत्र

वर उल्लेखित माहिती ही खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी कुठल्याही पातळीवर रद्द होऊ शकते याची मला कल्पना आहे. अशी उमेदवारी रद्द केल्यास माझी कुठलीही हरकत असणार नाही.

................
(उमेदवाराचे नाव व सही)

| सोबत जोडावयाची कागदपत्रे | जोडले आहे/नाही |
|---|---|
| १ आधार कार्ड | |
| २ दहावीची सनद | |
| ३ दहावीची गुणपत्रक | |
| ४ आय.टी.आय. चे चार सत्राची गुणपत्रके | |
| ५ मागासवर्गीय असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| ६ आर्थिक दृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र इ. | |
| ७ www.apprentieshipindia.gov.in याव्दारे ऑनलाईन अर्ज केल्याचे Screen shot/ Print | |

(टिप:- प्रत्यक्ष किंवा टपालाने पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. यामुळे प्रत्यक्ष किंवा टपालाने अर्ज पाठवू नये)